## प्रकरण ६ वे.

## जगजीवनराव प्रतिनिधी आणि सांगोल्याचा तह.

श्रीनिवास परशुराम उर्फ श्रीपतराव प्रतिनिधी याचा मृत्यू २५ नोव्हेंबर १७४६ रोजी झाला. श्रीपतराव प्रतिनिधीस पुत्र नव्हता. त्यामुळे प्रतिनिधीपद कोणास द्यावयाचे हा छ.शाहू पुढे प्रश्न होता. श्रीपतरावने आपल्या हयातीत आपला बंधू विशाळगडकर प्रतिनिधी कृष्णाजी परशुराम याचा मुलगा अमृतराव कृष्णाजी यास दत्तक घेतले होते. परंतु छ. शाहू महाराजांनी या दत्तक विधानास मान्यता दिली नाही. तसेच पुढे विशाळगडकर प्रतिनिधी गंगाधर कृष्णाजी याचा मृत्यू झाल्यानंतर कोल्हापूर छत्रपती संभाजी याने गंगाधर कृष्णाजीच्या मुलास प्रतिनिधी न नेमता अमृतराव कृष्णाजी यास आपला प्रतिनिधी नेमले होते.[१] त्यामुळे श्रीपतराव प्रतिनिधीच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ जगजीवनराव यास प्रतिनिधीपद देण्याचे छ.शाहू महाराजानी ठरवले. जगजीवनराव यास दादोबा असेही म्हणत असत. या जगजीवनराव उर्फ दादोबा यास १७ डिसेंबर १७४६ रोजी प्रतिनिधिपदाची वस्त्रे देण्यात आली.[२]

जगजीवनराव हे प्रतिनिधी होईपर्यंत कोकणातील [रत्नागीरी जिल्हयातील] महिपत गडावर वास्तव्य करुन होते. त्या प्रदेशातील त्याच्या जहागीरीतील वसूलीचे काम ते पहात असत. प्रतिनिधीपदाची वस्त्रे दिल्यानंतर छ.शाहू महाराजांनी अनुभवी यमाजी शिवदेवास प्रतिनिधीच्या मुतालिकांचे काम दिले. जगजीवनराव प्रतिनिधीचा शिक्का पुढील प्रमाणे होता.

> " श्री आई आदिपुरुष श्री शाहू छत्रपति स्वामी कृपानिधी ।
> तस्य जगजीवन परशुराम प्रतिनिधो "[३]

छ.शाहू व जगजीवनराव प्रतिनिधी :

श्रीपतराव प्रतिनिधीनंतर छ.शाहूने हे प्रतिनिधीपद त्याच्याच घराण्यात ठेवले. श्रीपतराव प्रतिनिधीवर शाहूचा लोभ होता. श्रीपतराव-च्या मृत्यूने शाहूस फार दु:ख झाले. शाहूचेही वय आता झाले होते. सर्व जुने सोबती त्यांना सोडून जाऊ लागल्यामुळे त्याची वृत्ती उदास बनली होती. आवडती रक्षा बिरूबाईचा मृत्यू, मदारी हत्तीचा मृत्यू, वाढत चाललेले वार्धक्य, तसेच पोटी संतान नाही, सर्वामुळे दिवसें दिवस वाढत चाललेली खिन्नता, त्यातच १५ ऑगस्ट १७४८ रोजी समजूतदार अशा धाकट्या राणीचा मृत्यू झाला. शाहू माहुली व सातारा यांच्यामध्ये छावणी देवून राहू लागले.

छ.शाहू महाराजाची थोरली पत्नी सकवारबाई ही मात्र महाराजांच्या आज्ञे विरूध्द व मर्जी विरूध्द वर्तन करीत असे. छ.शाहूच्या मृत्यूनंतर आपणास हवा तो दत्तक घेऊन आपण आपल्या मर्जीप्रमाणे राज्य-कारभार चालवावा अशी तीची महत्वाकांक्षा होती. त्यादृष्टीने तिने दरबारातील प्रतिनिधी व त्याचे मुतालिक यमाजी शिवदेव यांना हाताशी धरून कारस्थाने चालविली होती.

छ.शाहूने सुध्दा आपल्या नंतरची राज्याची व्यवस्था करण्याविषयी विचार सुरू केला होता. त्याने पंतप्रधान चिटणीस पोतनीस इ. च्या विचाराने मूळ भोसले कुळातील खानवटे, मुंगी व हिंगणी बेरडी येथील घराण्या-तील शहाणी, गुणागुणीत मुले पाहण्याची योजना आखण्यात आली. ही बातमी सातारा किल्ल्यावर असलेल्या ताराबाईस समजली व तीने शाहू महाराजाना निरोप पाठवला की - " दुसरे मूल कां पाहतां ? राज्यास धनी शिवाजीराजे आपले त्यास मूल जाले ते मी गुप्तरूपे ठेविले ते असोन दुसरे दत्तक कां करिता ?[४] ताराबाईच्या या निरोपामुळे भोसले घराण्यातील मुले

आणण्या विषयीची योजना बारगळली. ताराबाईच्या सांगण्यावरुन ताराबाईचा नातू रामराजा हा अस्सल वंशाचा असता बाहेरचा दत्तक घेऊन कलह वाढवण्यात अर्थ नाही, असा विचार करुन तो रामराजा खरा की खोटा या विषयी चौकशी सुरु केली. ताराबाईने हे मूल बाजीराव उर्फ भगवंतराव अमात्य बावडेकर यांच्याकडे लहानपणी ठेवले होते. पुढे त्यास दर्याबाई निंबाळकरकडे पानगावला पाठवण्यात आले होते. म्हणून बाजीराव उर्फ भगवंतराव अमात्य याचेकडून खात्री करुन घेण्यासाठी अमात्यास आणण्यासाठी गोविंदराव चिटणीस व यशवंतराव पोतनीस यांना भगवंतराव अमात्याकडे पाठऊन त्यास सातारयास आणले. कृष्णाजीच्या सानिध्यात त्यास विचारले असता त्याने हे खरे आहे असे सांगीतले.[५] त्यावरुन छ.शाहू महाराज व पंतप्रधान, चिटणीस, पोतनिस यांची खात्री पटली. या घटने विषयी पंतप्रतिनिधीच्या बखरीमध्ये पुढील प्रमाणे वर्णन आहे.

" रामचंद्र निळकंठ अमात्य यांचे पुत्र बाजीराव अमात्य बावडीयास असून ते सातारयास आले होते. त्याजपाशी राजा शिवछत्रपती म्हणून ताराबाई साहेब यांचा पुत्र त्यांचा [शिवाजीचा] पुत्र अमात्य याकडे होते. तो राजपुत्र आम्हापाशी आहे. म्हणून बाजीराव यांनी विनंती केली, परंतु सर्व लोकांची खात्री होण्याबद्दल महाराजांनी आज्ञा केली की, आम्ही प्रकृतीमुळे अशक्त आहों त्यास आमचे ठिकाणी प्रतिनिधी आहेत. त्यास प्रतिनिधी व तुम्ही व पेशवे व दाभाडे सेनापती आणखी मानकरी मोठमोठे माहुलीस कृष्णेवर जाऊन हा राजपुत्र खरा म्हणून अमात्यपंत यांणी प्रतिनिधीशी हातावर उदक पेशवे वगैरे सरदार यांचे खात्रीनिशी घालावे म्हणजे आमची खात्री झाली. इतके बोलतांच सदरी लिहिले सर्व मानकरी माहुलीस जाऊन अमात्य यांनी शपथ वाहून उदके घातली."[६]

छ.शाहू, पंतप्रधान व इतर प्रमुख प्रधान रामराजा खरा आहे, अस्सल वंशाचा आहे याची खात्री करुन देत असतानाच सकवारबाईने प्रतिनिधी व

यमाजी पंत शिवदेव यांचा विचार घेऊन आपल्या मर्जीप्रमाणे रघुजी भोसल्याचा पुत्र दत्तक घेण्याचे कारस्थान रचले. तीने या कारस्थानात कोल्हापूरचे छ.संभाजीराजे व नागपूरकर रघुजी भोसले यांना सामील करून घेण्याचा प्रयत्न सुरु केला. ही बातमी छ.शाहू महाराजांना समजताच त्यांची शारीरपिडा वाढत गेली. ऑगस्ट १७४९ पासून शाहूची प्रकृती फार बिघडली. पुढे चार सोडे चार महिने तो अंथरुणास खिळून होता. या काळात अधून-मधून त्यास भ्रमही होत असे.

सकवारबाईने ताराबाईचा नातू खोटा आहे हे सर्व ताराबाईचे थोतांड आहे अशी मसलत सुरु केली. तेव्हा पेशवे व चिटणीस यांनी पेशव्या-कडील विश्वासू कारकून व गोविंदराव चिटणीसाकडील कारकून व कांही स्वार पानगांवी रवाना केले.[७] याच वेळी कारभा-याचा प्रवेश महाराजाच्या पर्यंत होऊ नये याची सकवारबाई दक्षता घेऊ लागली. तेव्हा शाहू महाराजाना या प्रसंगाची जाणीव होऊन त्यांनी पंतप्रधान यांना बोलवून चिटणीससमोर स्वहस्ते मराठी राज्य सूत्रचालक त्यासंबंधी दोन गादया तयार करून दिल्या. यासंबंधी चिटणीसांच्या बखरीत पुढील प्रमाणे वृत्तांत दिला आहे.

" सकवारबाईने प्रतिनिधी दादोबा व यमाजीपंत यास विचारात घेऊन त्याची फौज जमाव करून करवीर संभाजीराजे यांजकडे राजकारण त्याणी यावे ऐसे पाठविले. आणि पानगांवी आपणाकडून खंडेराव न्यायाधिश पाठवून ठेविले. ताराबाईसाहेब यांचा बंदोबस्त करावा म्हणून गडकरी व किल्ल्याचे सुभे यासी राजकारण केले. प्रधान, चिटणीस, कारभारी गाळून प्रतिनिधीकडून कारभार राजकारण चालविले. यात महाराजाची शरीरपीडा अधिक होत चालली. यावरून महाराजास व्यथा बहुत होत चालली. सर्व कारभारी बखेडे व विचार करिता, यांचा प्रवेश महाराजापर्यंत होऊ नये ऐसा विचार [बाई] करु लागली. त्या समयी महाराजानी मनी आणिले की -

" हा समय कठीण. सरदार आपाविले ते येऊन पावत नाहीत. प्रधान याजहून बलवान, विचारवानही कोण्ही नाही " त्यांस एकांती बोलावून आपले हातची यादी लिहून त्यांत कलमें पन्हाळयाचे [व] हे राज्य एक न करावे. तेथील घेऊ नये. दुसरे, मूल आहे म्हणतात ते करावे. त्यांच्या आज्ञेत राहून सर्वांचे आहे तसे चालवून तालुके ज्याचे त्याजकडे व सरदारी चालवून त्यांचे नजर पेशकशी व हुजूर महाल व किल्ले राज्य चालते ते तसे चालवावे. ऐशी कलमें लिहून सदरहू प्रमाणे चालवितो म्हणून शक्तयुक्त लिहून घेतले. त्यांसही राज्यास अधिकारी दत्तक होईल ते तुंम्हास अंतर देणार नाहीतं म्हणून चिठ्ठी दिली. गोविंदराव यांचे विद्यमाने एकांती यादी ठरवून दिली."

छ.शाहू महाराज यांच्या हातच्या ज्या दोन यादयाच्यामुळे पेशवा हाच येथून पुढे मराठी राज्याचा सूत्रचालक किंवा प्रमुख बनला. त्या यादया पुढील प्रमाणे -

यादी नं.१

ओळ.

१. श्री

२. राजमान रा बालाजी प्रधान

३. पडित यास आज्ञा तुम्ही फौ -

४. ज धरनें सखास आज्ञा केली

५. त्यांच्या दैव नाहीं महारा -

६. जास लिखनें जाले नाही बर हात

७. नाही राजभार चाला पाहिजे

८. तर पुढे ठंस बसवने कोलापुर

९. चे न करने चिटणीसास सर -

१०. व सांगितले तसे करने वस

११. होई ल त्याच्या आज्ञे -

१२. त चालून राज मंडल चालव

१३. ने. चिटनीस स्वामीचे इस -

१४. वासू त्याचा तुमच्या

१५. विचारे राज राखने वंस होई -

१६. ल तो तुमची घालमेल करनार नाई

१७. सुदन - आसा

यादी नं. २

ओळ

१. श्री

२. राजमान रा। बालाजी पंडित प्रधान

३. आज्ञा जे राजभार तुम्ही चालवा

४. ल हा भरवसा स्वामीस आहे पहि

५. ले. सांगितले खातरजमा ती चिटनी -

६. सानी आढळ कली तुमचे मसतकी

७. हत ठविला आहे वस होईल तो

८. तुमचे पद प्रधान चालवील करी -

९. ल आतर तर सफत आसे त्याचे

१०. आज्ञेत चालून सेवा करने राज

११. राखने बहुत काय लिहिने सुदन
९

१२. असा.

या दोन याद्या म्हणजे मराठेशाहीच्या सूत्रचालकत्वाची शाहूने पेशव्यास करून दिलेली सनदच होय.

छ.शाहूच्या आजाराची बातमी बहुतेक मराठा सरदार मुत्सद्दी व कारभारी यांना समजली होती. हे सर्व सातारा येथे जमा झाले होते. छ.शाहू महाराजानी राणी सकवारबाईची समजून काढण्याचा परोपरीने प्रयत्न केला. त्यांनी राणीस विचारले " राजकारण करणारे तुझे विश्वासू कोण आहेत ? तेव्हा प्रतिनिधी यमाजीपंत, सेनापती दाभाडे व दत्ताजी गायकवाड आहेत असे सांगीतले.[१०] छ.शाहू महाराजांनी राणीस समजावून सांगीतले की यांच्याकडून राज्यकारभार तडीस जाणार नाही. पण राणीची समजूत पटली नाही.

गोविंदराव चिटणीसाने महाराजांच्या आज्ञेने सातारा येथे असलेल्या सेनापती, सरलष्कर, फत्तेसिंग भोसले, सेनासाहेब सुभा इ. सर्व सरदाराशी चर्चा केली. परंतु " मी राज्य संभाळतो " असे कोणी म्हंटले नाही.

गोविंदराव चिटणीसाने प्रतिनिधीस विचारले त्याने सुध्दा नकारार्थी उत्तर दिले. यासंबंधी पंतप्रतिनिधीच्या बखरीत पुढील उल्लेख आढळतो.

" शाहू महाराज यांणी प्रतिनिधीस विचारलें की तुम्ही सर्व राज्याचा बंदोबस्त कराल की काय, त्यांणी विनंती केली की, तीस ३०००० हजार फौज जवळ आहे. तेंव्हा पेशावे यास विचारले त्यांणी १०,००० लक्ष फौजे जवळ आहे. आणि हुकूम झाल्यास जितकी फौज पाहिले तितकी जमा करं व आज्ञेप्रमाणे राज्याचा बंदोबस्त राखीन अशी विनंती केली. त्याजवरुन राजाची मर्जी पेशवे याजवर प्रसन्न होऊन आपल्या पैजारा व निशाणे व शिक्के करार आपली पेशावे यांचे ताबीन करुन सर्व सरदार, मानकरी यांशी हुकूम झालाकी, पेशावे यांचे हुकूमांत सर्वांनी चालावे, कोणी पित्तवा केल्यास त्यांचे पारिपत पेशावे करतील अशी आज्ञा झाली.[११] "

कोल्हापूरकर छ.संभाजी हे या प्रकरणापासून अलिप्त राहिले. रघुजी

भोसले वेळेत आले नाहीत. सर्व सरदारांनी राज्य संभाळण्याबाबत असमर्थता दाखवली. त्यामुळे शाहू महाराजांची खात्री झाली की, प्रधान पंता शिवाय दुसरा कोणीही राज्य संभाळू शकणार नाही. त्यांनी पेशव्यास बोलावून सांगून ठेवले की, " आम्ही देवब्राम्हणांस धर्मादाय, अग्रहार व खैरखैरात व ज्यास भाऊबंध व गोत्रज व आणखी इतर कुणबी मराठे लोक वगैरे नाना जाती यांस, चाकरीबद्दल व सरंजाम, व जहागिरा व गांव, जमिनी, वगैरे लोकांस आम्ही इनाम देणगी दिली आहे, ती तुम्ही आमचे पाठीमागे चालवावी, कोणास अटकाव करूं नये. आमच्या हातचे देणगीस बाध आणिल्यास व आम्ही मान दिलेल्या लोकांचा छळ वगैरे केल्यास तुम्हाकडे पेशवाई पद कायम राहणार नाही." [१२]

सकवारबाईच्या कारस्थानामुळे अगोदरच वृध्द झालेल्या महाराजांचा आजार वाढत गेला. शेवटी छ.शाहू महाराजांना सर्व अष्टप्रधान, मानकरी, मुत्सद्दी व कारभारी यांना बोलावून घेऊन आज्ञा केली की, " राज्यास धनी पुत्र करून सर्वांनी आज्ञेत चालून राज्य देवब्राह्मणांचे हे एक विचारे रक्षावे." [१३]

याप्रमाणे राज्यकारभाराची सर्व निरवानिरव केल्यानंतर ता. १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा येथे रंगमहालाचे वाडयात शाहू महाराज मरण पावले. छ.शाहूचा मृत्यू होताच पेशव्याने पुढे काही बखेडे होऊ नयेत म्हणून शहराचा बंदोबस्त ठेवला. तसेच सकवारबाईकडे सहगमना विषयी विचारणा केली. शपतीनि आजपर्यंत अनेक खटपटी केल्या होत्या परंतु ज्यांच्या भरवशावर आपण खटपटकरत होतो त्यांच्याच्याने शेवट लागणार नाही असे वाटून आणि मागे राहिलो तर हालअपेष्टा सोसाव्या लागतील, त्यापेक्षा सहगमनच बरे असे वाटून तीने सहगमन केले. राणी सकवारबाईचा सहगमनाचा निरोप पेशव्याकडे येताच ताबडतोब त्याने जगजीवनराव प्रतिनिधी व त्याचा मुतालीक यमाजीपंत शिवदेव यांना बेडया घालून कैद केले आणि अनुक्रमे पुरंदर व कावनई किल्ल्यावर

कैदेत टाकले. पंतप्रतिनिधीच्या बखरीत मात्र प्रतिनिधीस सिंहगडावर, मुतालीक यमाजीपंत यास लोहगडावर व सेनापती दाभाडेस कुवरीचे किल्ल्यावर ठेवले असा उल्लेख आहे.[१४]

रामराजेंचा राज्याभिषेक : -

छ.शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर पेशव्याने बापूजी खंडेराव चिटणीस, धोडो अनंत पुरंदरे, ताराबाईकडील चिंतो विनायक व पेशव्याकडील लिंबाजी अनंत व इंद्रोजी कदम इ. सरदारांबरोबर पांच हजार फौज देऊन रामराजास घेऊन येण्यासाठी त्यांना पानगांवी पाठवीले. पानगावी रामराजाचा बंदोबस्त अगोदरच चांगला ठेवण्यात आला होता. या सरदारानी दर्याबाई निंबाळकर व रामराजे यांना सातारला आणले. २६ डिसेंबर १७४९ रोजी कृष्णाकाठी वडूज जवळ शाकुंतेधराच्या देवालयात ताराबाई व रामराजे यांची भेट झाली.[१५] शुभ मुहूर्तावर साता-यात प्रवेश व्हावा म्हणून वडूज आरळे नजीक ते मुक्काम राहिले. ता.४ जानेवारी १७५० हा दिवस शहरात प्रवेश तसेच राज्याभिषेक करण्यासाठी ठरवण्यात आला. त्यादृष्टीने सातारा येथे सर्व तयारी करुन त्याच दिवशी राज्यारोहण केले. राज्यारोहण प्रसंगी अष्टप्रधान मंडळाची आवश्यकता निर्माण झाली. कांही पदांच्या बाबतीत घालमेल करुन पूर्वीचे अष्टप्रधान ठेवण्यात आले.

राज्यरोहण प्रसंगी प्रथेप्रमाणे छत्रपतींचे प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक होते. पण प्रतिनिधी जगजीवनराव व त्यांचे मुतालीक यमाजी शिवदेव यावेळी तुरंगात होते. राज्यारोहण प्रसंगी प्रतितिधीची जरूर भासली. ती तो केवळ प्रधान होता म्हणून नव्हे तर शाहूच्या काळात साताराच्या कारभारात प्रतिनिधीचे महत्व फार होते. दरबारातील प्रतिनिधीचे हे महत्व व स्थान लोकांना माहित होते. शाहूच्या कोणत्याही दरबारी कामकाजात प्रतिनिधीचा सहभाग नाही असे होत नसे. म्हणून व अष्टप्रधानातील मानाने

सर्वा पेक्षा श्रेष्ठ म्हणून तसेच एक प्रथा म्हणून प्रतिनिधी राज्यारोहणास असणे आवश्यक होते.

ताराबाईने राज्यारोहण प्रसंगी प्रतिनिधीस आणावे अशी आज्ञा केल्यानंतर प्रधानपंतानी सांगितले की, " प्रतिनिधी व त्यांचे मुतालीक कैदेत आहेत ते मुक्त झाल्यास बखेडा होईल. तरी त्यांना मुक्त करता येत नाही." यास्तव दुस-यास पद देण्या विषयी हुकूम व्हावा अशी विनंती पेशव्यानी केली. तेव्हा ताराबाईने पेशव्यास सांगितले " तुमची मर्जी प्रतिनिधीस आणावयाची नाही तरी कृष्णाजी परशराम विशाळगडकर यांचे वंशातील घ्यावा "[१६] कोल्हापूरकर प्रतिनिधी गंगाधर कृष्ण यांच्या मृत्यूनंतर त्याचा बंधू अमृत कृष्ण यास छ. संभाजीने आपले प्रतिनिधीपद दिले होते. कारण गंगाधर कृष्णचा मुलगा भवानराव हा त्यावेळी अल्पवयीन होता. पण भवानराव यास कोल्हापूरकडील प्रतिनिधीपद न मिळाल्यामुळे गंगाधर कृष्णची स्त्री रूसून येऊन विशाळगडावरून उतरून धोपेश्वर येथे पुत्रासहीत येऊन राहिली होती. त्याकडे पेशव्याने स्वार सरंजाम पाठवून त्यांना सातारा येथे आणले. व भवानराव यांस " श्रीनिवास परशराम असे नांव ठेऊन त्यांना सातारा छत्रपतींचे प्रतिनिधीपद दिले.[१७] यमाजीपंताचा पुतण्या की जो पेशव्यांकडे होता त्यास भवानराव प्रतिनिधीचा मुतालीक म्हणून नेमले. तथापि कांही ठिकाणी यमाजीपंताचा शत्रू गोपाळ महादेव पेंढारकर यांस प्रतिनिधीचा मुतालीक नेमल्याचे म्हंटले आहे.

छ. शाहूच्या अखेरच्या काळात जगजीवनराव प्रतिनिधी, यमाजी शिवदेव यांनी सकवारबाईच्या साहयाने कारस्थाने करून पेशव्यास मराठी राज्याचे प्रमुखत्व मिळू नये अशा खटपटी चालवल्या होत्या. पेशवा ते विसरणे शक्य नव्हते. छ. शाहूच्या सनदेने तो मराठी राज्याचा खरा सूत्रचालक झाला होता. त्यामुळे पेशव्यास विरोध करणा-यात एकमेव प्रतिष्ठित व प्रबळ सरदार प्रतिनिधी हाच होता. त्यामुळे त्याचा एकदा बंदोबस्त झाला म्हणजे छत्रपतीच्या

दरबारात पेशव्यास विरोधच राहणार नव्हता. म्हणून पेशव्याने प्रतिनिधीपदाचे महत्व कमी करण्यासाठी विरोधकांना कैदेत टाकून आपल्या म्हणण्याप्रमाणे वागणार भवानराव यास छ. रामराजाचे प्रतिनिधीपद दिले. या कृतीमुळे प्रतिनिधीपदा सारख्या अत्यंत महत्वाच्या पदाची सुध्दा घालमेल पेशवा करू शकतो ही सर्वांना समजावे आणि पेशव्या विरोधी जाण्याचे कोणी धाडस करू नये असा पेशव्यांचा हेतू असल्याचे जाणवते. खऱ्या अर्थाने शाहूने पेशव्यांच्या हुकूमात सर्वांनी चालावे कोणी फितवा केल्यास त्याचे पारिपत्य पेशवे करतील " अशी जी आज्ञा दिली होती तीचा पहिला प्रयोग व तोही ताबडतोब प्रतिनिधीवरच करण्यात आला.

सांगोल्याची मोहीम :

छ. रामराजाचा राज्याभिषेक होऊन राज्यकारभारास सुरुवात होताच पेशवा व ताराबाई यांच्यात मतभेद निर्माण झाले. याचे महत्वाचे कारण म्हणजे ताराबाईस वाटे की, रामराजास आपल्या ताब्यात ठेऊन आपण सर्व कारभार स्वत:च्या मर्जीप्रमाणे करावा आणि सर्वांनी आपल्या आज्ञेत वागावे पण पेशव्यास ही गोष्ट मान्य नव्हती. शाहू महाराजानी स्वहस्ते पेशव्यास मराठी राज्यसूत्र चालकत्वाची सनदच दिली होती. तीचा वापर करुन तो सत्ता चालवत होता. त्यामुळे ताराबाई व पेशवा यांच्यात संघर्ष उत्पन्न झाला. ताराबाईने पुन्हा आपल्या हाती सत्ता येण्यासाठी अनेक खटपटी केल्या आणि त्या पेशव्यास त्याच्या आयुष्या अखेर पुरल्या.

दोन महिन्यातच पेशवा व ताराबाई यांच्यात हा बेबनाव झाला. ताराबाईने मनामध्ये विकल्प धरुन सिंहगडावर राजाराम महाराजांची छत्री होती तेथे दर्शनाचे निमित्ताने जाऊन ती सचिवाकडे राहिली.[१८] ताराबाईच्या कारभारास मराठा मंडळातील कोणाचीच फारशी अनुकूलता नव्हती. रघुजी भोसल्याने ही नानासाहेब पेशव्याची बाजू उचलून धरली. रामराजामध्ये विशेष

कर्तृत्व नाही याचा प्रत्यय दोन-तीन महिन्यातच सर्वांना आला होता. त्यामुळे प्रत्येकाने पेशव्यास विरोध न करता पेशव्याकडून आपली सोय लावून घेतली. त्यांने ही फारसे कोणास न दुखता सर्व सरदारांची व त्यांच्या कारभाराची व्यवस्था लावून दिली.

ताराबाईची समजूत काढण्यासाठी पेशव्याने तिला पुण्यास बोलावले पण सुरुवातीस ती आली नाही. पेशव्याने जेंव्हा सिंहगडच सचिवांकडून घेतला. तेंव्हा नाईलाजाने ती पुण्यास आली.[१९] तीच्या बरोबर भगवंतराव अमात्य व पंत सचिव हे दोघे होते. पेशव्यांच्या बोलवण्यावरून रघुजी भोसले व रामराजा सुध्दा पुण्यास आले. सर्व जण एकत्र झाल्यानंतर पेशव्याने मोठया चातुर्यनिवव मुत्सद्दीगिरीने ताराबाईच्या संमतीने विरोधी पक्षातील लोकांची व्यवस्था लावली. ताराबाईच्या परवानगीने व रामराज्याच्या आज्ञेने पंतसचिवाचा सिंहगड व त्याखालील प्रदेश पेशव्याने आपल्या ताब्यात घेतला.[२०] रघुजी भोसल्यास व-हाड, गोंडवण व बंगाल या प्रांताच्या सनदा देऊन प्रतिनिधीस खच्चीकरणासाठी व-हाडातील प्रतिनिधीचा मुलूख याच वेळी रघुजी भोसल्यास देण्यात आला.

रामराजा व ताराबाई पुण्यास आल्यावर वाटाघाटी करण्यासाठी पेशव्याने जगजीवनराव प्रतिनिधी व त्याचा मुतालीक यमाजीपंत यांना कैदेतून मोकळे केले.[२१] सातारा या मराठयांच्या राजधानी जवळचा बराच मुलूख प्रतिनिधीकडे होता. त्यामुळे छत्रपतीच्या साहयाने प्रतिनिधी पेशव्या विरुध्द अनेक कारस्थाने रचू शकत होता. तेंव्हा प्रतिनिधीकडचा शक्य तितका जास्त प्रदेश काढून घेतल्यानंतर प्रतिनिधीचे प्रस्थ कमी होईल हे पेशवा जाणून होता. जगजीवनराव प्रतिनिधी कैदेत होता आणि भवानराव प्रत्यक्ष प्रतिनिधी झाला असला तरी प्रदेश मात्र दादोबाच्या फौजेच्या ताब्यात होता. भवानराव हा नामधारीच प्रतिनिधी होता.

नानासाहेब पेशव्याने पुण्यामध्ये प्रतिनिधीवर दबाव आणून स्वत:कडील प्रदेशापैकी बराचसा मुलूख सोडून देण्याची कबूली लिहून घेतली.[२२] प्रतिनिधीने दबावाने जरी तसे लिहून दिले होते तरी ती कबूली मनापासून नव्हती. ठरल्याप्रमाणे पेशव्याकडे मुलूख देण्यासाठी प्रतिनिधीने यमाजी शिवदेवास सांगोल्यास पाठविले. यमाजी सांगेला व मंगळवेढा येथे पुढे गेल्यानंतर त्याने पेशव्या विरुध्द लढण्याची तयारी सुरु केली. त्याने पेशव्या विरुध्द उघड बंडावा सुरु केला. यमाजी शिवदेव हा छत्रपतीच्या प्रतिनिधीचा मुतालीक. प्रतिनिधी म्हणजे पेशव्या पेक्षा वरच्या दर्जाचा व हुद्दयाचा अधिकारी म्हणून प्रतिनिधीचा बंडावा पेशव्याने मोडणे लौकीकदृष्टया योग्य दिसले नसते. त्यांचा बंडावा खुद्द छत्रपतीनेच मोडला पाहिजे. शिवाय रामराजाही आपल्या सानिध्यात व ताब्यात असला पाहिजे असा विचार पेशवा नानासाहेब व त्याचा चुलत भाऊ सदाशिवराव भाऊ यांनी केला. त्यांनी सांगोल्यावर छ.रामराजाची स्वारी आयोजित केली. रामराजाबरोबर सदाशिवराव भाऊ रामचंद्र मल्हार, गोविंदराव चिटणीस, यशवंतराव पोतनीस, नाना पुरंदरे इ.ना पाठविण्यात आले.

प्रतिनिधीच्या तर्फे भांडून रामराजास आपल्या ताब्यात घेतल्यावर पेशव्यास शह बसेल असा यमाजीचा तर्क होता. याबाबत यमाजीस प्रतिनिधीचा पाठींबा होता म्हणूनच सांगोल्याची गढी लढवण्याची यमाजीने जय्यत तयारी केली होती. परंतु सदाशिवराव भाऊने मोठया हुशारीने व धुर्ततेने वागून यमाजीचा डाव सिध्दीस जाऊ दिला नाही. सदाशिवराव भाऊने सांगोल्याच्या गढीस मोर्चे लावले. यमाजीने भाऊ पुढे १५ दिवसातच शरणागती पत्करली. दादोबा प्रतिनिधीस नंतर पुरंदरहून सांगोल्यास आणले.[२३] प्रतिनिधीच्याहस्ते सदाशिवरावाने सांगोल्याचे ठाणे हस्तगत केले,आणि ते छत्रपतीच्या खाजगीकडे देऊन राणोजी मोहित्याच्या ताब्यात दिले. मंगळवेढयाचे ठाणेही याचवेळी घेतले पण पेशव्याने ते आपणाकडेच ठेऊन घेतले. हे सर्व झाल्यावर सदाशिवराव भाऊने सांगोल्यास महिनाभर मुक्काम करुन रामचंद्र मल्हाराच्या मदतीने व विद्यमाने राज्याच्या व राज्यकारभाराच्या व्यवस्थेचे नवीन ठराव व लेख छ.रामराजाकडून लेखी करुन घेतले. साता-यास ताराबाईचा यास अडथळा होईल

तसेच अनेकांची भिड पडेल म्हणून मुद्दाम ही व्यवस्था साता-यापासून दूर सांगोल्यास बसून निवांतपणे करण्यात आली.

<u>सांगोल्याची व्यवस्था :</u>

शाहूनंतर रामराजा मराठयांचा छत्रपती झाला. परंतु एका वर्षाच्या आतच मराठयांच्या राज्याच्या घटनेत पेशव्याने फार मोठा बदल घडवून आणला. मराठेशाहीत सत्तांतर घडून आले. छत्रपती नामधारी बनून मराठयांची खरीखुरी सत्ता पेशव्यांच्या हाती एकवटली. हा महत्वाचा राजकीय व घटनात्मक बदल घडून येण्यास प्रतिनिधी जगजीवनराव याचे सांगोला येथील बंड निमित्तमात्र ठरले.

सांगोल्यास या सर्व घडामोडी अथवा घटनात्मक बदल सदाशिवराव भाऊ व रामचंद्रबाबा यांनी घडवून आणले,असले तरी ते सर्व पेशव्यांच्या सम्मतीने व छत्रपती रामराजाच्या समक्ष आणि त्याच्या अनुमतीने घडले होते. त्यामुळे पेशव्याने विरोधकांना पूर्ण खाच्ची करुन टाकले होते. मराठयांच्या राज्यव्यवस्थे संबंधी सांगोल्यास जे ठराव झाले त्यास "सांगोल्याची व्यवस्था" "सांगोल्याचा बंदोबस्त" किंवा"सांगोल्याचा तह" असे म्हणतात. या सांगोल्याच्या व्यवस्थेने मात्र मराठी राज्याचा मुख्य असणारा छत्रपती नामधारी बनून सर्व सत्ता पेशव्यांच्या हातात गेली.

सांगोल्याच्या या व्यवस्थेमध्ये पेशवे पक्षाने विरोधी पक्षाचे नेतृत्व करणा-या प्रतिनिधीस सर्व प्रथम चोपून काढले. सांगोल्याच्या व्यवस्थेने प्रतिनिधीच्या मूळच्या प्रचंड असणा-या जहागीरीचा बराच संकोच करण्यात आला. त्याच्या जहागीरीतील बराच मोठा प्रदेश तोडून तो खुद्द छत्रपती, पेशवा, रघुजी भोसले, गोविंदराव, बापूजी, जिवाजी हे चिटणीस बंधू यांना

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

वाटण्यात आला. सांगोला व तेथून सातार पर्यंतचा प्रदेश छत्रपतीकडे, मंगळवेढा पेशव्याकडे, व-हाडातील प्रतिनिधीची सर्व जहागीर रघुजी भोसल्याकडे देण्यात आली. क-हाड हे प्रतिनिधीच्या जहागिरीचे प्रमुख ठाणे होते. त्यामुळे त्या ठाण्यावर शाह बसवण्यासाठी क-हाड लगतचे काळे, मोरगिरी, वगैरे भाग तोडून चिटणीस बंधूना दिला. त्यामुळे प्रतिनिधीची जहागीर फारच मर्यादित बनली. तसेच खुद्द प्रतिनिधीच्या कुटुंबातच पेशव्याने गृहकलह पेटवून दिला. तेथेच सदाशिवराव भाऊने २५ सप्टेंबर १७५० रोजी भवानराव यास आणून प्रतिनिधीपदावर कायम केले होते.[२४] नंतर दादोबास पुरंदरहून आणून सांगोला हस्तगत केले होते. त्यामुळे नव्या प्रतिनिधीचा सदाशिवराव भाऊस पाठींबा होता. तर ज्युन्यास त्याने असहय करून कैदेत ठेवले होते. पुढे दादोबाची सुटका झाल्यानंतर जहागीरीसाठी गृहकलक होऊन प्रतिनिधी पुन्हा कमकुवत बनला.

सांगोल्याची व्यवस्थेचा सारांश पुढील प्रमाणे -

[१] भावानरावास राज्याभिषेक समयी प्रतिनिधीपदावर आणिले होते. त्यास कायम करून, यमाजी शिवदेवाचा पुतण्या वासुदेव यास त्याचा मुतालीक नेमले.

[२] सेनापती दाभाडे बेहोष असत. त्यांचा अम्मल गुजराथेत बरोबर चालत नाही. सबब त्यांस खर्चापुरती रक्कम गायकवाडानी देण्याचे ठरवून गुजराथ प्रांत पेशवे व गायकवाड यांनी निम्मे निम्मे वाटून घेण्याचा करार झाला.

[३] कर्नाटक सुभा बापूजी नाईकाकडे होता, तो जास्ती रसद कबूल करून पेशव्यांनी स्वत:कडे घेतला.

[४] गोविंदराव चिटणीसानी महाराजांपाशी राहून पंतप्रधानाचे अनुमतीने कारभार करावा. बापूजी खंडेराव चिटणीस यांने फौजेसह महाराजापाशी रहावे.

[५] त्याबद्दल प्रतिनिधीकडील कांही मुलूख व इतर मिळून चार लक्षांचा सरंजाम हे दोघे चिटणीस व त्यांचा पुतण्या रामराव्जी बाजी या तिघांच्या नांवे करुन दिला.

[६] यशवंतराव पोतनीस यांस कारखाने व खाजगी कारभार सांगून पोतनिशी व चाळीस हजारांचा सरंजाम दिला.

[७] देवराव लपाटे यांस हुजूर खाजगीचे काम व तालुके, त्यांचे त्यांचे त्याजकडे करार केले.

[८] हुजूरचे खर्चास पूर्वी अष्टप्रधानाकडून व सरदार मामलेदारांकडून नेमणूकीप्रमाणे सालाबाद पाठवावा. त्याच्या वराता हुजरुन करुन ऐवज मागवून घ्यावा.

[९] बाळोजी शिवाजी डुबल [साळुंके] हा सकवारबाईचा आप्त होता. त्याच्याकडे मिरजेचे ठाणे होते ते त्याजकडून काढून घेऊन ते शिवाजी बल्लाळ जोशी [थोरल्या माधवराव पेशव्याचा सासरा] यास देण्यात आले.

वरील प्रमाणे आपल्या सोईची अशी प्रदेशाची आदलाबदल सांगोला येथे अनेक ठराव करुन व त्यास छ. रामराजाची संमती घेऊन करण्यात आले.

सांगोला येथे प्रधानांच्या नव्याने नेमणूका करण्यात आल्या त्या पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| [१] प्रधान | - | बाळाजी पंत [बाळाजी बाजीराव] |
| [२] प्रतिनिधी | - | भवानराव गंगाधर |
| [३] सेनापती व सेनाखासकेल | - | त्रिंबकराव दाभाडे [यशवंतरावाचा मुलगा] |
| [४] न्यायाधीश | - | खंडेराव काशी |
| [५] पंडितराव | - | धोंडोभट उपाध्ये |

[६] मंत्री - धनश्याम नारायण

[७] सचिव - चिमणाजी नारायण

[८] अमात्य - भगवंतराव रामचंद्र

[९] सुमंत - विठ्ठलराव आनंदराव

या अष्टप्रधानाशिवाय आणखी कांही नेमणूका झाल्या त्यातील काही महत्वाच्या खालील प्रमाणे.

चिटणीस - रामराव जिवाजी - काम गोविंदराव पहात असे.

सरखेल - तुळाजी आंग्रे

राजाज्ञा - भवानी शंकर

वजारतमाब - मानाजी आंग्रे

सरलष्कर - निंबाजी नाईक निंबाळकर

अशाप्रकारे अष्टप्रधान व इतर मानक-यांच्या नेमणूका सांगोला येथे पेशव्यांच्या मर्जीप्रमाणे करून त्या पुढे कायम करण्यात आल्या.[२५]

वरील अष्टप्रधानांच्या नेमणूका परंपरा म्हणून चालत आल्या होत्या, म्हणून त्यांच्या नेमणूका करण्यात आल्या. खरे पाहता त्यांची ही पदे फक्त नामधारी होती. सर्व सत्ता प्रत्यक्षात पेशव्याच्याच हाती होती. प्रतिनिधी सेनापती, अमात्य व सचिव हे दुर्बल झाले होते. या व्यवस्थेने त्यांना आणखी कमकुवत करून टाकण्यात आले.

छ.शाहूने मृत्यूपूर्वी पेशव्यास मराठीशाहीच्या सूत्र चालकत्वाची जी सनद दिली होती. त्यात " वंश होईल त्याच्या आज्ञेत राहून राजमंडळ चालवावे " अशी त्यास आज्ञा होती. परंतु बानासाहेब पेशव्याने शाहूच्या मृत्यूस एक वर्ष होण्यापूर्वीच पूर्वीच्या व्यवस्थेस बाध आणली.

छ.रामराजा दुबळा निघाला. सांगोला तहापासून पेशव्याने राज्य-कारभाराची सर्व सूत्रे आपल्या हातात केंद्रीत केली. अशाप्रकारे मराठयांच्या राज्याची खरीखुरी सत्ता छत्रपतीच्या हातून पेशव्या हाती गेली. परिणामत: तेथून पुढे पेशवाच मराठी राज्याचा प्रमुख बनला. म्हणूनच मराठयांच्या इतिहासामध्ये आक्टोबर १७५० मध्ये झालेल्या सांगोल्याच्या व्यवस्थेस महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या व्यवस्थेमुळे किंवा तहामुळे मराठयांच्या इतिहासात वेगळे वळण लागल्याचे स्पष्ट होते.

## रामराजाची कैद :

सांगोल्याचे सर्व कामकाज आटोपल्यानंतर रामराजा दि.१७ नोव्हेंबर १७५० रोजी सातारा येथे परत आला. ताराबाईस रामराजा व पेशवा यांचा राग आला होता. ती रामराजाच्या कुटुंब कबील्यासह बंदोबस्ताने सातारा किल्ल्यावर राहिली होती. तीला वाटत होते की, रामराजाने पेशव्यास दाबून राज्यकारभार करावा. या उलट पेशव्यास वाटत होते की, छ.रामराजाने ताराबाईस दाबून सर्व बंदोबस्त करावा. पण राजारामास यातील काहीच शक्य नव्हते. कारण त्याची ती क्षमता नव्हती. त्यामुळे ताराबाई व पेशवा या दोघानाही छत्रपती आपल्या कबजात असावा असे वाटे.

ताराबाईच्या भेटीस रामराजाने किल्ल्यावर जायचे ठरवले. बापूजी खंडेराव चिटणीस वगैरे मंडळीस ताराबाईच्या राजारामास कैदेत ठेवण्याच्या हालचालीचा सुगावा लागला.होता. म्हणून त्यांनी किल्ल्यावर जाण्यास छ.रामराजास विरोध केला. पण रामराजा पुन्हा किल्ल्यावर गेला. ताराबाईची भेट घेतली. तीने त्याची निर्भत्सना केली. रामराजा गडावरुन परत येण्यास निघाला, पण किल्लेदाराने त्यास विरोध केला व गडाचे दरवाजे लावून घेतले. रामराजा हतबल होऊन परत वाडयात गेला. ताराबाईने

चौकी पहारे ठेवून बंदोबस्त केला. छ.रामराजा व ताराबाई यांच्या गृहकलहात आपण न पडता तो दुरुन पहाण्याचे धोरण पेशव्याने स्वीकारले.

अशाप्रकारे रामराजा २४ नोव्हेंबर १७५० रोजी कैद झाला. तो पुढे २८ मार्च १७६३ रोजी कैदेतून सुटला म्हणजे जवळ जवळ साडे बारा वर्षे रामराजा मराठयांचा छत्रपती कैदेत होता. या काळात पेशव्याने त्यास सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. त्याच्या परस्पर निर्णय घेऊन मराठेशाहीचा कारभार केला. त्यामुळे सांगोल्याच्या तहा पासून पुढे " छत्रपतीपद " हे नामधारी बनले.

श्रीपतरावाच्या मृत्यूनंतर जगजीवनराव यास इ.स. १७४६ मध्ये प्रतिनिधीपद मिळाले होते. परंतु पुढे दत्तकाच्या व वारसाच्या प्रश्नाबाबत राणी सकवारबाईने केलेल्या कट कारस्थानात तो सामील झाला. ही सर्व कट कारस्थाने अयशस्वी झाल्याने जगजीवनराव त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले. प्रतिनिधीपद गमावून त्यास कैदेत पडावे लागले. शाहूच्या मृत्यू नंतर मराठयांच्या राजकारणात पेशव्यांचे वर्चस्व निर्माण झाले. पेशव्याने आपला प्रतिस्पर्धी म्हणून प्रतिनिधीस खच्चीकरण्यासाठी त्याचा सरंजाम कमी केला व त्याच्या ठिकाणी भवानरावाची नियुक्ती केली. तथापि प्रतिनिधीचा प्रदेश जगजीवनरावच्या फौजांच्या ताब्यात असल्यामुळे भवानराव हा केवळ नामधारी प्रतिनिधी बनला. पुढे जगजीवनरावचा मुतालिक यमाजी शिवदेव याने पेशव्या विरुध्द बंड पुकारले. परंतु ते यशस्वी झाले नाही. त्यातूनच इ.स. १७५० चा सांगोल्याचा तह निर्माण झाला. सांगोल्याच्या तहामुळे मराठयांच्या राजघटनेत अमूलाग्र बदल झाला. सर्व सत्ता ही पेशव्यांच्या हाती एकवटली. मराठयांच्या राजकारणात व राज्यकारभारात छत्रपती आणि अन्य प्रधान केवळ नामधारी बनले. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत मराठयांच्या राजकारणात व राज्यकारभारात प्रतिनिधीला प्रतिष्ठा होती. त्याचा दबदबा होता. छत्रपतीच्या खालोखाल प्रतिनिधीचेच स्थान

होते. तो कोणत्याही बाबतीत पेशव्याला कमी नव्हता. सांगोल्याच्या तहानंतर मात्र परिस्थिती झपाटयाने बदलत गेली. व प्रतिनिधींची मराठयांच्या राजकारणातील प्रतिष्ठा नामशेष झाली.

पेशव्याने पुढे ताराबाईच्या मध्यस्थिमुळे जगजीवनराव प्रतिनिधीची कैदेतून सशर्थ सुटका केली. त्यानंतर प्रतिनिधीचा गृहकलह सुरु झाला. पेशवा तटस्थ राहिला. त्यात जगजीवनराव यशस्वी झाला. पुढे त्याने पेशव्याशी तडजोडीचे धोरण स्विकारले. इ.स. १७५४ मध्ये त्याचे निधन झाले.

---------x---------

## -: संदर्भ :-


१. भारत वर्ष. वर्ष १ ले, अंक १ ला, पंतप्रतिनिधीची बखर. पृ.५३.

२. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, मध्य विभाग भाग-२ पृ.१०३,

भिडे व्ही.जी., साताराचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधी आणि अष्टप्रधानाचा इतिहास.

पृ.१२७.

३. भागवत अ.ना., साताराच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास.ग्रंथांक-२.

पृ.२०२.

४. चिटणीस म.रा., थोरले शाहू महाराज यांचे चरित्र. पृ.१२५.

५. किता - पृ.१२८.

६. पंतप्रतिनिधींची बखार. पृ.५४.

७. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.१२३.

८. चिटणीस म.रा., "उपरोक्त" पृ.१२९-१३०

९. आपटे द.वि. व ओतुरकर रा.वि.[सं] महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास.

पृ.१२५-१२६,

सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.१२७-१२८,

राजवाडे वि.का., म.इ.साधने, खंड ६ वा. पृ.२९९.

१०. सरेदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.१२५.

११. पंतप्रतिनिधीची बखार. पृ.५४.

१२. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ.१२७.

१३. चिटणीस म.रा, "उपरोक्त" पृ.१३२.

१४. चिटणीस म.रा, "उपरोक्त" पृ.१३३.

१५. चिटणीस म.रा., "उपरोक्त" पृ. १३४,
सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ. १६२.

१६. भागवत अ.ना., "उपरोक्त" पृ. २२८.
सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ. १४५.

१७. पंतप्रतिनिधीची बखार, पृ. ५५.

१८. सरदेसाई गो.स., "उपरोक्त" पृ. २२७.

१९. सरदेसाई गो.स., नानासाहेब पेशवे. पृ.९२.

२०. राजवाडे वि.का., म.इ.साधने खंड ६ वा. पृ. ५४.

२१. कित्ता. पृ. ५७.

२२. सरदेसाई गो.स., नानासाहेब पेशवे. पृ.९४.

२३. सरदेसाई गो.स., पे.द.नि. कागद खंड २६, पत्र क्र.९२ व ९४,
पृ. ७४-७५.

२४. सरदेसाई गो.स., म.रि.,म.वि.भाग-२, पृ. २४७,
भागवत अ.ना, "उपरोक्त" पृ. २४२-२४३.

२५. सरदेसाई गो.स., म.रि.,म.वि.भाग-२, पृ. २४९-२५०.

.....